


साप्ताहिक

# निळे प्रतिक



मुख्य संपादक : रतनकुमार साळवे
एम.ए.(एम.सी.जे.), एम.ए.(फुले-डॉ.आंबेडकर थॉट),
एम.ए. (पाली अँड बुद्धिझम), मो. ९९२३५०२३२०

वर्ष १६ वे | अंक क्र. ४ | सोमवार | २३ जून २०२५ | पृष्ठे ४, किंमत २ रु.

# झोपडपट्ट्यांवर अतिक्रमणाचा हतोडा

## गुलमंडी,निराला बाजार, सिडको, जालना रोडवर मात्र मौन का?

**सा. निळे प्रतिक वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर : महापालिकेने शहरातील अतिक्रमण हटवण्याची मोहीम जोमात सुरू केली असली तरी, ही मोहीम गोरगरीब, कामगार, झोपडपट्टीवासीयांपुरतीच मर्यादित राहत असल्याचा आरोप शहरातील नागरिकांनी केला आहे. गुलमंडी, निराला बाजार, सिडको, जालना रोड या महत्त्वाच्या ठिकाणी होणाऱ्या भव्य अतिक्रमणांकडे मात्र मनपा दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

**मुकुंदवाडीच्या घटनेने मनपा व पोलीस प्रशासन हादरले**

दोन दिवसांपूर्वी मुकुंदवाडी बस स्टॉपजवळ किरकोळ कारणावरून एका निरागस तरुणाचा खून करण्यात आला. या घटनेनंतर मनपा आणि पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले. तत्काळ अतिक्रमण हटवण्यात आले, मात्र संबंधित अतिक्रमणधारकांना कोणतीही पूर्वसूचना न देता कारवाई करण्यात आली, अशी तक्रार त्यांच्याकडून करण्यात आली आहे.

**फक्त झोपडपट्टीवरच कारवाई का?**

सुभेदार रामजी नगर येथील झोपडपट्टीवासीय मागील दोन महिन्यांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करत आहेत. भावसिंगपुरा परिसरातही जोरदार कारवाई झाली असून नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. पावसाळ्याच्या दिवसांत झोपड्या हटवल्या जात आहेत, मात्र त्या झोपड्यांमध्ये राहणाऱ्या गोरगरीब जनतेच्या पुनर्वसनाचा कोणताही





विचार मनपाकडून केलेला नाही.

**गुलमंडी, निराला बाजार, सिडकोवर मौन का?**

शहराच्या मध्यवर्ती व अतिमहत्त्वाच्या भागात असलेल्या गुलमंडी, निराला बाजार, सिडको परिसरात धनदांडग्यांनी केलेल्या भव्य अतिक्रमणांबाबत मात्र प्रशासनाने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. झोपडपट्टीतील अतिक्रमण हटवताना वेग दाखवणाऱ्या मनपाची कारवाई या भागांमध्ये कशी होत नाही, असा सवाल आता सर्वसामान्य जनता विचारत आहे.

**आयुक्त श्रीकांत यांना खुले आव्हान**

अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी मनपा आयुक्त श्रीकांत यांना खुले आव्हान दिले आहे जर अतिक्रमणविरोधी मोहीम ही खऱ्या अर्थाने निष्पक्ष असेल, तर मग श्रीमंत, राजकीय नेते, आणि अधिकारी वर्गाच्या आडवलेल्या प्रॉपर्टींवरही कारवाई करून दाखवा!

**झोपडपट्टीवर राजकारण?**

झोपडपट्टीतील नागरिकांवर कठोर कारवाई होते, तर दुसरीकडे ज्या आरोपींवर खुनासारखे गंभीर गुन्हे आहेत त्यांना जामीन मिळतो. मात्र आपल्या हक्कासाठी शांततेने आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होतात, हे दुहेरी न्यायालयीन धोरण असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.मनपा व पोलीस प्रशासन सडेतोड भूमिका घेणार का, की पुन्हा एकदा गरीबांवरच हक्क गाजवला जाणार?

शहरातील नागरिकांचा रोष आता उफाळून आला असून, येत्या काळात या कारवाईवर राजकीय आणि सामाजिक पातळीवर तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

# अल्पवयीन मुलीवर वडीलानेच केला जबरी अत्याचार

## घटनेचे गांभीर्य ओळखुन पिडीत मुलीला पोलीसांनी तत्परतेने मिळवून दिला न्याय...

सोलापुर : मंगळवेढा (तालुका प्रतिनिधी) एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर स्वतः वडीलांनीच अत्याचार केल्याची घटना घडली असून ही घटना मोहोळ तालुक्यातील आहे. अत्याचारित मुलगी रात्री ८.३० ला मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये येवून घटना कथन करताच मंगळवेढा पोलीसांनी तत्परतेने या घटनेची दखल घेवून फिर्याद दाखल केली व शून्य क्रमांकाने कामती पोलीस स्टेशनला वर्ग करून सदर पिडीत मुलीला कामती येथे रात्री शासकीय वाहनाने पोहच केल्याने त्या पिडितेला न्याय मिळाल्याने मंगळवेढा पोलीसांचे कामकाजाबाबत कौतुक होत आहे.

या घटनेची हकीकत अशी की, सदर पिडीत मुलगी ही मोहोळ तालुक्याच्या ग्रामीण भागात राहावयास असून हिच्या आईचे वडीलांबरोबर पटत नसल्यामुळे ती वडीलापासून गेली १० वर्षापासून विभक्त माहेरी मंगळवेढयाच्या ग्रामीण भागात रहावयास आहे. सायं.५.३० वाजता यातील पिडीत मुलीचे वडील घरी होते तर तिचे आजोबा एका कारखान्यात कामावर गेले होते. ही संधी साधून आरोपी वडीलाने मुलीस नवीन तुला ड्रेस आणला आहे, तो मला घालून दाखव असे नाटक केले. त्या पिडीत मुलीने नवीन कपडे घातले नाहीत. आरोपी तथा वडीलाने घराच्या दाराला कडी लावून आंथरून टाकून हात पाय दाबण्याचा बहाणा केला. त्यावेळी पिडीतेने वडीलाचा शब्द प्रमाणित मानून पाय दाबण्याची सेवा करत असताना आरोपीने तिच्या हाताला धरून जवळ घेतले व अंगावरील कपडे काढून जबरदस्तीने अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवले. यावेळी पिडीतेने स्वतःची सुटका करून घेण्यासाठी आरोपीच्या हाताला चावा घेतला. मात्र पिडीत मुलीपेक्षा आरोपीची ताकद जास्त असल्याने त्याने तिला सोडले नाही. तदनंतर या घटनेबाबत तु कोणाला काही सांगू नकोस असा दमही दिला. यावेळी पिडीतेने आरोपीस जोरात ढकलून सुटका करून घेतली व कपडे घालून दाराची कडी काढून बाहेर पळत येवून बाहेरून दरवाजाला कडी लावली. तदनंतर पिडीतेने मदतीसाठी बाहेर हाका मारल्या मात्र तिच्या मदतीला कोणीही धावून आले नाही. या दरम्यान पिडीता बाहेरच अंधारात बसून राहिली. रात्री ९ वाजता तिचे आजोबा कामावरून घरी आले. पिडीतेने मंगळवेढयाच्या ग्रामीण भागात राहात असलेल्या आईला फोन करून घडलेली हकीकत कथन केली. यावेळी आईने तिला मंगळवेढयाकडे येण्याचा सल्ला दिला. सायं.६ वाजता ती तिथून मिळेल त्या वाहनाने मंगळवेढा बस स्टँडवर रात्री ८ वाजता आली.

त्यावेळी आई पण येथे पोहचली होती. पिडीत मुलगी व तिची आई पोलीस स्टेशनला येवून सदर घटनेची हकीकत पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांना कथन केली.

या घटनेची पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांना माहिती देताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली डी. वाय. एस. पी. विक्रांत गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर, निर्भया पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक विजय पिसे आदिंच्या पथकाने घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ मंगळवेढा पोलीस ठाण्यात वडीलाविरूद्ध अत्याचाराचा गुन्हा दाखल केला. तसेच कामती पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्याशी संपर्क साधून आरोपीला ताब्यात घेण्याच्या सुचना करून सदर गुन्हा कामती पोलीस स्टेशनला वर्ग केला.

रात्रीची वेळ लक्षात घेवून पोलीस पथकाने पिडीत मुलीची सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी शासकीय पोलीस गाडीने कामती येथे पोहच करण्यात आले. दरम्यान मंगळवेढा पोलीसानी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्परतेने केलेल्या कारवाईबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संपादकीय...

## वादविवाद की कट कारस्थान? संभाजीनगरातील राजकारणाचा उफाळलेला संघर्ष

पालकमंत्री संजय सिरसाट आणि खासदार इम्तियाज जलील यांच्यातील वाद आता एका धगधगत्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. एका बाजूला भ्रष्टाचाराच्या आरोपांचं आवर्तन आहे, तर दुसरीकडे 'हरिजन' शब्दप्रयोगावरून सामाजिक अस्मितेचा उद्रेक झाला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर २३ जून रोजी छत्रपती संभाजीनगरात जलील यांच्या विरोधात मोर्चा काढण्यात येणार आहे. मात्र, या मोर्च्याच्या उद्दिष्टावरच अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत.

### कुणाचा मोर्चा, कुणासाठी?

हा मोर्चा खरंच समाजाच्या भावना दुखावल्यामुळे आहे की राजकीय पोळी भाजण्यासाठी? हा प्रश्न अनेक तरुण विचारत आहेत. समाजमाध्यमांवर सध्या एकच रणकंदन आहे काही जण या मोर्चाला भाजप किंवा पालकमंत्र्यांची पाठराखण असल्याचा आरोप करत आहेत. काहींनी तर स्पष्टपणे म्हटले आहे की, काही मंडळींनी संजय सिरसाट यांच्याकडे सात कोटींच्या फायली अडकलेल्या असल्यामुळे त्यांना खूश करण्यासाठी हा मोर्चा काढायचा घाट घातला आहे.

### जलील यांचा दावा काय?

इम्तियाज जलील यांनी केलेल्या स्पष्टीकरणानुसार, त्यांनी हरिजन शब्द स्वतःहून उच्चारलेला नाही. संजय सिरसाट यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांच्या दस्तऐवजामधून वाचलेला तो शब्द होता, असं ते ठामपणे सांगतात. "जर मी दोषी असेन, तर तो दस्तऐवज छापणारे सरकारसुद्धा दोषी आहे," असा सवाल करून त्यांनी सरळसरळ कायद्यालाच आव्हान दिलं आहे. एवढंच नव्हे तर ते जामीन घेणार नसल्याची ठाम भूमिका घेत आहेत.

### समाजात फूट की सजगता?

सध्या आंबेडकरी तरुणांमध्ये एकवाक्यता नाही. काहीजण मोर्च्याच्या विरोधात आहेत, काही तटस्थ, काही मोर्च्याच्या बाजुने, तर काहीजण संतप्त. कारण स्पष्ट आहे मोर्चा एखाद्या राजकीय हेतूनं प्रेरित असल्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अनेक कार्यकर्ते म्हणतात की, जर खरोखरच सामाजिक भावना दुखावल्या असतील, तर सत्ताधारी पक्षांनी मूकपणे राजकारण बाजूला ठेवून पुढाकार घ्यायला हवा होता. पण येथे उलट चित्र दिसते मोर्चा आहे, पण शिवसेनेचे तथाकथित सैनिक मात्र कुठेही दिसत नाहीत. ज्यांच्यामुळे वाद निर्माण झाला, त्यांच्याच गोटात शांतता आहे.

### संजय सिरसाट यांचं मौन अर्थपूर्ण?

एरवी २४ तास माध्यमांसमोर राहणारे पालकमंत्री संजय सिरसाट या गंभीर प्रकरणात मात्र आश्चर्यकारक शांत आहेत. आरोप त्यांच्यावर झाले असतानाही त्यांनी माध्यमांसमोर येऊन ठोस भूमिका घेतलेली नाही. त्यांच्या मौनामुळेच अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे त्यांनी मौन का बाळगले? हा खरोखरच निष्पक्षतेचा प्रयत्न आहे की काही राजकीय गणितांचा भाग? त्यांच्या मौनामुळे या प्रकरणाभोवती अधिकच धूसरता निर्माण झाली आहे.

### तरुणांचं काय?

या राजकीय झगड्यात सर्वाधिक नुकसान होतंय ते तरुणांचं. कालच दोन गटांमध्ये झालेल्या तुफान हाणामारीत तरुण गुंतले. पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले. एकीकडे राजकीय नेते आपली मते मांडत आहेत, फाईली काढत आहेत, आरोप करत आहेत; तर दुसरीकडे सामान्य तरुण भडकतात, मार खातात आणि गुन्हेगारीच्या चक्रात अडकतात.

### पुढे काय?

जलील यांना अटक होणार का? मोर्चा खरोखरच यशस्वी होईल का? बौद्ध समाजातील फूट निर्माण होईल का?

शिवसेनेची भूमिका स्पष्ट होईल का? हे प्रश्न अनुत्तरित आहेत. मात्र, इतकं नक्की या सगळ्या प्रकरणात राजकीय स्वार्थ, सामाजिक भावना आणि तरुणांची दिशाहीनता यांची त्रिसंधी झाली आहे. वाद ही लोकशाहीतील एक अनिवार्य प्रक्रिया आहे. पण तो वाद जर केवळ वैयक्तिक सूड, सत्तेचा दबाव किंवा आपलं हीत साधण्याचं साधन बनला, तर समाजासाठी घातक आहे. आपल्या भावना व्यक्त करणं हे महत्वाचं, पण ते कोणाच्या हातातलं बाहुलं बनून न करता सजगतेनं, विवेकानं आणि व्यापक दृष्टिकोनातून झालं पाहिजे.

धारदार भुमिका घ्या पण कोणाचं प्यादं बनू नका.!

# सेल्फी काढण्याच्या नादात धबधब्याच्या प्रवाहात वाहिलेला तरूण सतर्कतेचे बचावला

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धबधबे आता प्रवाहित झाले आहेत.

हे धबधबे पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करत आहेत.काही अति उत्साही पर्यटकांमुळे या धबधब्यांच्या ठिकाणी अपघात घडताना पाहायला मिळतात. राधानगरी तालुक्यातील राऊतवाडी धबधबा येथे एक पर्यटकाने सेल्फी काढण्याच्या नादात पाय घसरून पाण्याच्या प्रवाहात पडला. तो वाहून जात असताना दैव बलवत्तर म्हणून तेथील पर्यटकांनी त्याला वाचवलं आहे. गेल्या आठवड्याभरापासून पश्चिम घाट माथ्यावर मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. परिणामी जिल्ह्यातील अनेक धबधबे प्रवाहित झाले आहेत. जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असून यामुळे येथील प्रसिद्ध राऊतवाडी धबधबा सुद्धा प्रवाहित झाला आहे. या धबधब्याला प्रवाह जास्त आहे. हा धबधबा पाहण्यासाठी दरवर्षी पर्यटक येथे गर्दी करत असतात. काहीजण धबधब्यात उतरून हुल्लडबाजी करताना देखील पाहायला मिळतात. या धबधब्यात एका पर्यटकाने सेल्फी काढण्यासाठी पाण्यात उतरला आणि यावेळी त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला आणि प्रवाहात वाहून जाऊ लागला. याचवेळी येथील काही पर्यटक त्वरित त्या तरुणाच्या मदतीसाठी पुढे सरसावले. मात्र पाण्याला प्रवाह असल्याने आणि बचावासाठी कोणतेही यंत्रसामग्री नसल्याने वाहून जाणाऱ्या व्यक्तीस बचाव करण्यास अडचणी निर्माण होत होत्या.

मात्र दैव बलवत्तर म्हणून या पर्यटकांनी मोठ्या अडचणीत वाहून जाणाऱ्या त्या तरुणासा बाहेर काढलं. मात्र ज्या मोबाईल मध्ये तो सेल्फी काढण्यासाठी पाण्यात उतरला होता, तो मोबाईल वाहून गेला. धबधब्यांना प्रवाह जास्त असल्याने पर्यटकांनी स्वतःचा जीव सांभाळून पर्यटन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पाठवणीच्या वेळी नववधूने लग्नाला दिला नकार!!!

## (ही गोष्ट तुम्हाला अंतर्मुख करेल)

लग्न पार पडलं होतं. आता निरोपाचा क्षण आला होता. नेहा आपल्या आईला मिठी मारून रडली, मग ती आपल्या वडिलांच्या कुशीत शिरली. सगळ्यांच्या डोळ्यात अश्रू होते. ती आपल्या लहान बहिणीच्या सोबत सजवलेल्या गाडीकडे निघाली होती. नवरदेव अविनाश आपला मित्र विकाससोबत गप्पा मारत होता.विकास म्हणाला,"यार अविनाश, एक काम कर घरी पोचताक्षणी अमृतबाग हॉटेलमध्ये जाऊ आणि मस्त जेवण करू इथे तुझ्या लग्नात काही मजा आली नाही जेवणात." तेवढ्यात अविनाशचा धाकटा भाऊ राकेश म्हटला, " पनीरची भाजी पण काही खास नव्हतीआणि रसगुल्ल्यात तर रसच नव्हता. खूपच पांचट जेवण होते रे " आणि मोठ्याने हसायला लागला.अविनाशही हसत म्हणाला "जाऊ आपण अमृतबागला, जे पाहिजे ते खा इथे काही चवच नव्हती पुऱ्यापण गरम नव्हत्या." मामा व मावस भाऊ, मावस बहिणी म्हणाल्या की आपण झोमॅटो वरून काहीतरी इथे चटपट मागून घेऊ. हे सगळं ऐकून, नेहा तिचं पाऊल गाडीत टाकणारच होती की ती अचानक मागे वळली, डोईवरचा पदर काढून कंबरेला खोवत तडक वडिलांकडे आली आणि त्यांचा हात हातात घेत म्हणाली, "मी या लग्नाला नकार देते बाबा माझं हे लग्न मला मान्य नाही!" सगळे थक्क झाले नेहाच्या सासरच्यांना तर धक्काच बसला कोणालाच काही कळेनासे झाले.. सगळे तिच्याजवळ जमले. सासरे श्यामराव पुढे आले." अगं सुनबाई, असं झालं तरी काय? लग्न पार पडलं आहे आता अचानक का नाही म्हणतेस?" अविनाशही धावत आला, त्याचे मित्र, भावंडं सर्वजण नेहा सासऱ्यांना म्हणाली," मामंजी, माझ्या आई-वडिलांनी स्वतःच्या इच्छा मारून माझं शिक्षण, माझं भविष्य घडवलं वडिलांनी किती रात्रंदिवस जागून या लग्नासाठी तयारी केली आईनं नवीन साडीही घेतली नाही, दुसऱ्याची साडी घालून लग्नात उभी आहे वडील १५० रुपयांचा शर्ट घालून उभे आहेत त्या शर्टच्या आत शंभर भोकं असलेलं बनियन आहे! आणि माझ्या नवऱ्याला पुऱ्या थंड वाटल्या?? त्याच्या मित्राला पनीर आवडलं नाही?? दिराला रसगुल्ला फिक्का वाटला?? ही फक्त अन्नावर टीका नाही, माझ्या वडिलांच्या त्यागावर, मेहनतीवर आणि इज्जतीवर चिखलफेक आहे हे जेवण कॅटररनं बनवलंय. माझ्या वडिलांनी नाही... पण त्यांच्या मनानं, मनगटानं, त्यागानं ते अन्न बनलंय आणि त्या अन्नाची निंदा करणं म्हणजे माझ्या वडिलांचा अपमान करणं." वडिल म्हणाले "बाळा, एवढ्या छोट्याशा गोष्टीसाठी?" नेहा म्हणाली" ही छोटी गोष्ट नाही बाबा माझ्या पतीच्या नजरेत जर माझ्या पित्याचा मान नाही, तर मला असा संसार नको माझ्यात तुमचं सर्वस्व आहे, हे ज्यांना दिसत नाहीत, त्यांच्याशी माझं नातं मी जोडणार नाही." इतकं बोलल्यावर सगळे शांत झाले अविनाश पुढे आला, हात जोडले सासऱ्यांपुढे, "माफ करा बाबा माझी चूक झाली मी अज्ञानीपणानं बोललो" श्यामराव पुढे आले, डोळ्यात पाणी होतं "बेटा, मी सुन घेऊन जायचो म्हणत होतो, पण मला मुलगी मिळाली माझं नशीब की ईश्वराने तुला माझी कन्या बनवली माफ कर मला मला पूर्ण खात्री आहे की तू माझं घर उजळवशील." नेहाने त्यांच्या पायाला स्पर्श केला. " मामंजी" ते म्हणाले "नाही, आता फक्त बाबा म्हण." दोघेही भारावून गेले... शंकरराव अभिमानानं पाहत होते.

आपली कन्या आज खऱ्या अर्थाने मोठी झाली होती... आता नेहा सासरी रवाना झाली मागे राहिलं फक्त तिचं घराभोवतीचं रिकामं झालेलं अंगण,आई-बाबांचे अश्रूंनी भरलेले डोळे आणि एक मोठा संदेश.... "जेव्हा आपण कुणाच्या मुलीच्या लग्नाला जाऊ, तेव्हा भाजी बेचव, पुऱ्या थंड , रसगुल्ला कोरडा वाटल्यासारखी टीका करू नका कारण त्या अन्नासाठी एका वडिलांनी स्वतःच्या स्वप्नांचा त्याग केलेला असतो, त्या जेवणाला बनायला केवळ २ तास लागले असतील, पण त्या अन्नामागे मुलीच्या पित्याचा अनेक वर्षांचा संघर्ष असतो "लेक" ही परकं धन नसते, ती आई-वडिलांची शान असते. जर ही कथा मनाला स्पर्शून गेली असेल, तर इतरांपर्यंत जरूर पोहोचवा लेकीचा मान ठेवा... एका वडिलाच्या स्वप्नांचा आदर ठेवा.

हे साप्ताहिक पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक रतनकुमार साळवे यांनी श्री प्रिंटर्स, अक्षयदीप प्लाझा, सिडको येथे छापून अयोध्या नगर, एफ ४/१४, सिडको एन-७, औरंगाबाद पिन ४३१ ००३ (महा.) येथे प्रसिद्ध केले. (या अंकात प्रकाशित झालेल्या वृत्ताविषयी संपादक सहमत असतीलच असे नाही. कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयाअंतर्गत) RNI. No. MAHMAR/2009/29271

# पुरोगामीतेच्या भूमीत अंधश्रद्धेचा अंधार




कोल्हापूर हे केवळ एक जिल्ह्याचे नाव नाही, तर ती आहे शाहूंच्या सामाजिक क्रांतीची, फुले-आंबेडकरांच्या विचारांची, आणि सत्यशोधक चळवळीच्या परंपरेची वैचारिक राजधानी आहे. पण आज हीच भूमी एका अशा घटनेमुळे धास्तावली आहे, जी तिच्या पुरोगामी ओळखीवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. नग्न अवस्थेत एका महिला आणि पुरुषाने केलेली भानामती, करणी व अघोरी कृत्यं केवळ संपूर्ण समाजमनाला अस्वस्थ करणारी आहेत. विशेष म्हणजे हे सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, या व्हिडिओंनी समाजमाध्यमांवर मोठी खळबळ उडवून दिली आहे.

आजही विज्ञानयुगात अंधश्रद्धेचा असा उन्मत्त झपाटा हेच दर्शवतो की शिक्षणाच्या विस्तारात आपण सामाजिक जागृतीचा गाभा कुठेतरी हरवला आहे. सरकारी स्तरावर ''अंधश्रद्धा निर्मूलन कायदा'' असतानाही या कायद्याची अंमलबजावणी ही कागदापुरती मर्यादित राहिली आहे का, असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

अघोरी कृत्यांमध्ये महिलांचाही सहभाग दिसणं ही आणखी गंभीर बाब आहे. ही केवळ वैयक्तिक अधोगती नाही, तर ती एका व्यापक सामाजिक अपयशाची लक्षणं आहेत. स्त्रियांना सशक्त करण्यासाठी लाखो रुपये खर्चून योजना राबवल्या जातात, पण विचारविश्व पुरोगामी करण्यासाठी जे 'मानसिक पुनर्बांधणीचे प्रयत्न' आवश्यक आहेत, ते फारच अपुरे पडताहेत. कोल्हापूर, सातारा, सांगलीसारख्या जिल्ह्यांनी अनेकदा पुरोगामी चळवळींना दिशा दिली. पण आज त्याच मातीमध्ये अशा घटना घडत असतील, तर ती वैचारिक नामुष्की नव्हे का? म्हणूनच, या प्रसंगाच्या निमित्ताने ही केवळ खळबळ समजून न थांबता, समाजाने आत्मपरीक्षण करण्याची ही वेळ आहे. शाळा-महाविद्यालयांमधून विज्ञाननिष्ठ विचारांचा प्रचार व्हावा, ग्रामसभांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन चर्चिलं जावं, आणि स्थानिक नेतृत्वाने स्पष्ट भूमिका घेऊन कारवाईसाठी पुढाकार घ्यावा, अशी ठाम अपेक्षा आहे. कारण, जर कोल्हापूरसारख्या पुरोगामी जिल्ह्यात अंधश्रद्धेचा अंधार पसरू लागला, तर तो उर्वरित महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा ठरू शकतो. जागतिक युगात स्वाभिमानी, विवेकी आणि विज्ञाननिष्ठ समाजच टिकून राहू शकतो, याची आठवण हे प्रकरण आपल्याला करून देत आहे.

**सुनिल पांडे**
**शहर उपप्रमुख रिपब्लिकन सेना**
**छत्रपती संभाजी नगर**
**(नेतृत्व: मा. आनंदराव आंबेडकर साहेब)**

## सोमवार पासून मनपा सीबीएसई शाळेत ज्युनिअर केजी प्रवेश फॉर्म वितरण सुरू होणार

**दै. निळे प्रतिक वृत्तसेवा**
छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या वतीने सहा सीबीएससी शाळा सुरू आहेत. या शाळेमधील ज्युनिअर केजी मध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवेश फॉर्म चे वितरण दिनांक २३ जून व २४ जून रोजी होणार आहे.

महानगरपालिकेच्या पूढील शाळेत उस्मानपुरा, गारखेडा ,प्रियदर्शनी, सिडको एन ०७, सिडको एन ११ आणि चेलीपुरा या ठिकाणी सीबीएसई चे वर्ग भरवले जातात. मा. आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या उपक्रमांतर्गत उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सीबीएससी शाळा उत्कृष्ट रित्या सुरू आहेत. या शाळांमधून एकूण ९०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५ २६ करिता ज्युनिअर केजी मध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांनी आपल्या परिसरातील शाळेतून प्रवेश फॉर्म घ्यावेत. पालकांनी प्रवेश फॉर्म व्यवस्थित भरून ३० जून पर्यंत संबंधित शाळेमध्ये जमा करावेत. लकी ड्रॉ पद्धतीने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहेत.

प्रत्येक शाळेत ज्युनिअर केजीच्या वर्गात चाळीस विद्यार्थी प्रवेशित होणार आहेत अशी माहिती सीबीएसई समन्वयक शशिकांत उबाळे यांनी दिली.

## गौताळा अभयारण्य पावसाळ्यात जुलै ते सप्टेंबर राहणार आता पर्यटकांसाठी बंद

:प्राण्यांच्या मॅटिंग पिरियडमुळे वन विभागाचा निर्णय; पर्यटकांचा हिरमोड

छत्रपती संभाजीनगर : पावसाळा प्राण्यांच्या मॅटिंग पिरियडसाठी (प्रजनन) महत्त्वाचा असतो. यादरम्यान प्राणी चिडचिड आणि आक्रमक होतात. परिणामी, पर्यटकांवर हल्ल्याची दाट शक्यता असते. त्यामुळे पावसाळ्यातील ३ महिने गौताळा अभयारण्य पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती वन विभागाकडून देण्यात आली.

जिल्ह्यातील कन्नड तालुक्याच्या भागात गौताळा अभयारण्याची स्थापना १९८६ मध्ये झाली. १७ गावांतील वनक्षेत्राचा यात समावेश आहे. २६० चौ. किमी क्षेत्रात हे अभयारण्य पसरले आहे. पावसाळ्यात हे अभयारण्य पाहण्यासारखे होते. परंतु, ऐन पावसाळ्यात हे अभयारण्य पर्यटकांसाठी बंद ठेवले जाते. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत असल्याच्या भावना पर्यटकांनी व्यक्त केल्या. पावसाळ्यात प्राणी-पक्ष्यांचा मॅटिंग पिरियडमध्ये व्यत्यय आणल्यास ते पर्यटकांवर हल्ला करण्याची शक्यता असते. समाधान पाटील, वनपाल, गौताळा यांनी सांगितले. पावसाळा हा प्राण्यांच्या मॅटिंग पिरियडसाठी खास मानला जातो. या मॅटिंग पिरियडमध्ये पक्षी किंवा प्राणी चिडचिड करतात, पर्यटकांनी अशा वेळी त्यांच्या मॅटिंग पिरियडमध्ये व्यत्यय आणला तर ते हल्ला करतात.

## आमदारांचा पीए असल्याचे सांगून सहा लाखांचा गंडा

बीड : आपण शिक्षक आमदार विक्रम काळे यांचे पीए असून तुम्हाला २५,१५ योजनेतील एक कोटीची विकास कामे मिळवून देतो, असे म्हणून वडवणी तालुक्यातील कान्हापूर येथील सरपंच पतीला ६ लाख २७ हजार रुपयांना गंडा घातला. याप्रकरणी शहर ठाण्यात या पीएविरोधात गुन्हा नोंद केला गेला.

विशेष म्हणजे या पीएने ग्रामविकास विभागाचा बनावट मेल आयडीकरुन त्यावरुन बीड जिल्हा परिषदेला मेलही पाठवला होता. वडवणी तालुक्यातील कान्हापूर येथील उत्तरेश्वर खताळ यांच्यापत्नी राधा खताळ या सरपंच आहेत.

# रिपब्लिकन विद्यार्थी सेनेत असंख्य नव्या चेहऱ्यांचा प्रवेश

## विविध पदांवर केल्या नियुक्त्या




छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व भारिप बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वात आज रिपब्लिकन विद्यार्थी सेनेत असंख्य नव्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रवेश केला. सामाजिक परिवर्तनाची दिशा घेऊन विद्यार्थ्यांनी संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. या प्रसंगी प्रदेशाध्यक्ष विवेक भाऊ बनसोडे यांच्या आदेशानुसार विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये: जिल्हाध्यक्ष: कुणाल भालेराव, विद्यापीठ परिक्षेत्र प्रमुख: प्रा. प्रबोधन बनसोडे (छ. संभाजीनगर, जालना, उस्मानाबाद) शहराध्यक्ष: बालाजी सोनवणे जिल्हा कार्याध्यक्ष: प्रवीण हिवराळे जिल्हा निरीक्षक: ॲड. तुषार अवचार, जिल्हा उपाध्यक्ष: सतीश शिंदे, या सर्वांना मा. आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. दरम्यान, नांदेड जिल्ह्यातून युवा विद्यार्थी नेते अक्षयकुमार गायकवाड यांनी जिल्हाध्यक्ष अंकुश सावते यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लिकन विद्यार्थी सेनेत जाहीर प्रवेश केला. यामुळे नांदेडमधील विद्यार्थी चळवळेस नवी उर्जा प्राप्त झाली आहे. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. सुनील वाकेकर, डॉ. सुशील सूर्यवंशी, चंद्रकांत रुपेकर, मिलिंद बनसोडे, संदीप गायकवाड, काकासाहेब गायकवाड, दिनेश आदमाणे, धम्मपाल भुजबळ, गणेश रगडे, अनिल शिरसे, प्रशांत गोडबोले, अस्कर खान, विकास हिवराळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिपब्लिकन विद्यार्थी सेनेत झालेला हा नवसंघटनात्मक बदल चळवळीसाठी नवी दिशा ठरणार असून युवकांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत नेतृत्व घडवावे, असे आवाहन यावेळी उपस्थितांनी केले. नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी योग्य ते प्रयत्न करण्यात असल्याचे सांगितले.



**जागतिक पातळीवरील बुध्द धम्माचे गाढे अभ्यासक, बुध्द धम्माचे मराठी व हिंदी साहित्यातील एक विद्वान लेखक, ज्यांना बाबासाहेबांचा अनेकदा सहवास मिळाला व ज्यांनी भारतभर बुध्द धम्माचा प्रचार व प्रसार केला असे पुज्यनिय डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या ३७ व्या स्मृती दिनानिमित्त शिवुर येथील भदन्त आनंद कौसल्यायन बुध्द विहार शिवुर ता.वैजापुर यांच्या वतीने ३७ व्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.**

**!!! धन्यवाद! जयभीम !! नमो बुध्दाय !!!**

# मनपाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या लढ्यातील युद्धात शहिदांच्या स्मृतींना उजाळा

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या वतीने मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार व उप आयुक्त लखीचंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली १८५७ च्या स्वातंत्र्याच्या पहिल्या लढ्यातील युद्धात शहीद झालेल्या क्रांतिवीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी उद्या सोमवार दिनांक २३ जून रोजी दुपारी ३.०० वाजता भारतरत्न मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे इतिहास तज्ञांचे व्याख्यान व शौर्य गाथेचा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

१८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपले छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) शहर हे एक अद्वितीय शहर होते.ते दक्षिण भारतातील एकमेव शहर होते याठिकाणी अनेक नागरिक आणि काही भारतीय सैनिक ब्रिटिशांच्या हातून शहीद झाले होते.

दक्षिण भारतात २३ जून १८५७ रोजी शहराच्या खाम नदीवरील छावणी लोखंडी पुलाजवळ भारतीय स्वातंत्र्याची पहिली लढाई सुरू झाली होती.या लढ्यातील हिंदी सैनिकांना ,क्रांतिकारकांना तोफेच्या तोंडी देऊन शहीद केले होते.या ऐतिहासिक दिनाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी मनपा च्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन सांस्कृतिक कार्यकारी अधिकारी शंभू विश्वासू यांनी केले आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात शहिद झालेल्यांना या कार्यक्रमामुळे खऱ्या अर्थाने श्रद्धांजली मिळणार असल्याचे म्हटले आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये राज्यपाल हरीभाऊ बांगडेंचा ताफा अडवला

औरंगाबाद : छत्रपती संभाजीनगर मधील मुकुंदवाडी परिसरात संजय नगर येथील अतिक्रमण हटवण्याची कारवाई केली. या कारवाईनंतर माजी खासदार इम्तियाज जलील यांनी रविवारी पाहणी केली. इम्तियाज जलील आल्यानंतर मोठी गर्दी झाली होती. यावेळी नागरिकांनी काही काळ राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांचा ताफा देखील अडवला होता. यामुळे मुकुंदवाडी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मुकुंदवाडीच्या कारवाईनंतर एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मुकुंदवाडी परिसर आणि संजय नगरात पाहणी केली. यावेळी नागरिकांनी कशा पद्धतीने मनपाने त्यांच्या घरावर बुलडोझर चालवला, याची कहानी सांगितली. याचवेळी परिसरातून भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांचा ताफा तेथून जात होता. पण नागरिकांनी हरीभाऊ बागडे यांचा ताफा अडवला. सुदैवाने राज्यपाल हरीभाऊ बागडे यांच्या ताफ्यावर संतापलेल्या नागरिकांनी आगळीक केली नाही. शेवटी सुरक्षा अधिकाऱ्यांनी गर्दीतून ताफा कसातरी बाहेर काढला.

इम्तियाज जलील यांनी अतिक्रमणाच्या कारवाईवर टीका करताना पोलिस आणि महानगरपालिका प्रशासनावर गंभीर आरोप केले. त्यांच्या मते, पोलिस आयुक्त गुलामगिरी करत असून केवळ गरिबांवरच कारवाई करत आहेत. तसेच महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशांचे पालन करत आहेत. भाजपच्या नेत्याने (संजय केणेकर) एका अधिकाऱ्याला सांगितले सगळे जमीनदोस्त करून टाका. मग प्रशासन नियमाप्रमाणे काम करणार की नेत्यांच्या मनाप्रमाणे काम करणार? एक नेता म्हणतो एफआयआर करा, दुसरा म्हणतो सगळे पडून टाका, काही नियम तुमच्यासाठी नाही का?, असा सवाल जलील यांनी केला. अशा कारवाया सुरू ठेवल्यास जनता रस्त्यावर उतरेल, असा इशाराही जलील यांनी प्रशासनाला दिला. यावेळी जलील यांनी शहरातील नशा आणि जुगाराच्या अड्ड्यांकडेही लक्ष वेधले. अनेक पोलिस स्टेशनच्या आसपास पत्त्याचे क्लब सुरू असूनही त्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. जाधव मांडीमध्ये अनधिकृत बांधकाम सुरू आहे. ही कारवाई केली तशी तिथे करू शकता. मात्र तिथे मोठे नेते आहेत.

# मनुवादी समूहालाही हवी संविधानाचीच ढाल

भारतीय इतिहासात धम्म स्वीकारण्याचे धाडस, प्रगल्भ विचार आणि समग्र समाज परिवर्तनाची दृष्टि यांचे एकमेव उदाहरण म्हणजे डॉ. बी.आर. आंबेडकर भारताच्या इतिहासात बौद्ध धम्माचा स्वीकार असे एकच व्यक्ती करू शकतात ते म्हणजे विद्याचे सागर डॉ, बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी आपल्या ज्ञानाने, संघर्षाने आणि नैतिकतेने संपूर्ण समाजाचा चेहरा बदलला, अशा महामानवांपैकी एक म्हणजे डॉ, बाबासाहेब आंबेडकर. त्यांना बोधिसत्व विद्येचे सागर म्हणून ओळखले जाते आणि हे नाव त्यांना लायकही होते, कारण त्यांनी शिक्षणाचा दिवा अंधकारमय जीवनात पेटवला आणि करोडो शोषित, वंचित, उपेक्षित लोकांना नवजीवन दिले, वर्णव्यवस्थेचे भोगलेले दुःख डॉ, बाबासाहेब आंबेडकर हे कधीच विसरले नाही, त्यांचे जीवन बालपणापासूनच संघर्षमय होते, एका तथाकथित नीच समजल्या जाणाऱ्या जातीत जन्म झाल्यामुळे त्यांना शाळेत बसायला जागा नव्हती, प्यायला पाणी नव्हते आणि समाजाने अपमानाची शृंखला त्यांच्याभोवती विणली होती. हे अपमान त्यांनी नुसते सहनच केले नाही तर ज्ञानाच्या बळावर त्याचा तीव्र प्रतिकार केला, गटारात दगड टाकणारे नव्हे तर इतिहास घडवणारे आयुष्यभर अपमान, तिरस्कार, बहिष्कार सहन करूनही डॉ, बाबासाहेबांनी कधीही वैयक्तिक द्वेष वा हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही. त्यांनी समाज सुधारण्यासाठी शिक्षण, कायदा, मानवता आणि नैतिकतेचे शस्त्र उचलले. म्हणूनच ते म्हणाले शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा! बौद्ध धम्माचा स्वीकार शांती आणि समतेची क्रांती डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांना जेव्हा जाणवले की वर्णव्यवस्था या देशातील मूळ समस्या आहे आणि ती हिंदू धर्मात कायम टिकवली जाणार आहे, तेव्हा त्यांनी त्यातून मुक्तीचा मार्ग शोधला. त्यांनी भारतीय संस्कृतीतच मूळ असलेल्या तथागत बुद्धांच्या धम्माचे पुन्हा नव्याने पुनरुज्जीवन केले. बुद्धांचा धम्म हा कोणत्याही देव-देवतांवर आधारित नसून, तो शांती, समता, करुणा आणि नैतिकतेवर आधारलेला आहे, डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून एका मोठ्या सामाजिक क्रांतीला सुरुवात केली. त्यांनी सांगितले की, ''मी हिंदू म्हणून जन्मलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही! हे त्यांचे वाक्य आजही लाखो लोकांना समतेचा मार्ग दाखवते, संविधान सर्वांचा आधारस्तंभ डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती केली. हे संविधान प्रत्येक नागरिकांना समान हक्क देऊन जात, धर्म, लिंग, भाषा याच्या पलीकडे जाऊन सर्वांना एकसमान न्याय आणि संधी देते, डॉ, बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानच आज या देशातील शोषित-पीडित लोकांचे रक्षण करत आहे, आश्चर्य म्हणजे ज्यांनी आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपमानित केले, त्या मनुवादी समूहालाही आज संविधानाचीच ढाल लागते. हीच डॉ, बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी होती, त्यांनी व्यक्तिगत सूड न घेता संपूर्ण समाजाचे कल्याण बघितले, ब्राह्मणवादाच्या तुलनेत डॉ, बाबासाहेब आंबेडकरांची महानता आज जगभरात पसरली असून त्यांची कीर्ती ब्राह्मणवाद्यांच्या कित्येक पटीने मोठी आहे. जगातील अनेक विद्यापीठात त्यांचे विचार अभ्यासले जातात, त्यांनी दिलेल्या समतेच्या विचारामुळे भारताला एक नवे लोकशाही रूप मिळाले, डॉ, बाबासाहेब आंबेडकरांचे उपकार स्मरणात ठेवावे आज गरज आहे ती बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आणि बौद्ध धम्माच्या नैतिकतेची पुर्नरचना करण्याची. संविधानाचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समतेच्या आणि बंधुत्वाच्या तत्वांची पूजा हीच खरी धम्मक्रांती ठरेल, जय भीम! नमो बुद्धाय!

भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक बौद्ध धम्माचे प्रचारक आणि प्रसारक प्रशिक सम्राट

